॥ सा हि श्रीरमृतां सताम् ॥

आयुर्वेद शिक्षण मंडळाचे

# अष्टांग आयुर्वेद महाविद्यालय, पुणे

१९३६ पासून

दिनांक : २०/११/२०१९

## "आरोग्यवर्धक पाककृती स्पर्धा अहवाल"

आयुर्वेद शिक्षण मंडळाचे संस्थापक कै. वै. ह. बा. परांजपे यांचा 36 व्या स्मृतिदिनानिमित्त अष्टांग आयुर्वेद महाविद्यालय आणि शारदा शक्ती (महाराष्ट्र युनिट) यांचेमार्फत "आरोग्यवर्धक पाककृती स्पर्धे" चे आयोजन दिनांक 19 नोव्हेंबर 2019 रोजी सकाळी 11 ते 1 या वेळेत आपल्या महाविद्यालयांमध्ये करण्यात आले होते.

या संपूर्ण स्पर्धेचे समन्वयन आपल्या महाविद्यालयाच्या स्वस्थवृत्त विभागाचे विभाग प्रमुख डॉ. प्रकाश ठोंबरे यांनी अतिशय उत्कृष्ट पद्धतीने केले होते. या अभिनव अशा स्पर्धेमध्ये प्रथम वर्ष ते अंतिम वर्षाच्या B.A.M.S. मधील विद्यार्थ्यांनी अतिशय उत्स्फूर्तपणे भाग घेतला होता. या स्पर्धेसाठी एकूण 13 गटांनी सहभाग घेतला होता. प्रत्येक गटामध्ये प्रत्येकी 4 विद्यार्थी समाविष्ट होते.

यामध्ये प्रामुख्याने पाककृतीचे प्रयोजन, त्याला लागणारा वेळ आणि खर्च, त्याची आकर्षक मांडणी या निकषांवर आधारित परीक्षण केले गेले. प्राधान्याने हिरवे मूग, दुधीभोपळा, गाजर, मेथी, पालक, मका, इत्यादी पदार्थांचा समावेश पाककृती करण्यासाठी करण्यात आला होता.

तयार करण्यात आलेल्या पाककृतीमध्ये प्राधान्याने शतावरी टिक्की, मुगाचे थालीपीठ, मुग भुजिया, मुगाच्या डाळीचा शिरा, मुगाचे आप्पे, गाजराची बर्फी, इत्यादी पाककृतींचा समावेश होता. या स्पर्धेचे परीक्षण भारती विद्यापीठ आयुर्वेद महाविद्यालयाच्या रसशास्त्र विभागाच्या विभागप्रमुख डॉ. सौ. माधुरी दळवी आणि अष्टांग आयुर्वेद महाविद्यालयाच्या शल्यतंत्र विभागाच्या विभागप्रमुख डॉ. सौ. स्मिता मोहोळे यांनी अचूकपणे परीक्षण केले. परीक्षणानंतर प्रथम तीन गटांना प्रमाणपत्र आणि पारितोषिके देण्यात आली. तर सहभागी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देण्यात आले.

या स्पर्धेमध्ये प्रथम तीन क्रमांक खालील प्रमाणे देण्यात आले –

1) प्रथम क्रमांक: गट क्र . १२ (भारती मिरगे, मृदुला आवारी, पूनम मोगली)

2) द्वितीय क्रमांक: गट क्र . ११ (स्वामीनी देशमुख, लक्ष्मीकांत कुलाल, गौरव डोखळे)

3) तृतीय क्रमांक: गट क्र . १ आणि गट क्र. ९ विभागून

गट क्र . १ (अंजली कोलते, कुशल तायडे, सुचिता सोनावळे, देवश्री पाडवी)

गट क्र. ९ (शालिनी राऊलवार, यशस्वी अंबुरे)

या कार्यक्रमाचे आयोजन करण्यासाठी भारती विद्यापीठ आयुर्वेद महाविद्यालयाच्या स्वस्थवृत्त विभागाच्या विभागप्रमुख डॉ. सौ. कीर्ती भाटी मॅडम यांनी समन्वयाचे काम केले. या स्पर्धेच्या पारितोषिक वितरण कार्यक्रमासाठी आयुर्वेद शिक्षण मंडळाचे सचिव डॉ. म. ह. परांजपे तसेच आयुर्वेद शिक्षण मंडळाचे सी. ई. ओ. श्री. सुनील बहिरट सर

----- 2

महाविद्यालय फोन : ०२० २४४३ २५०८ | फॅक्स: ०२०-२४३२७९१० | रुग्णालय फोन : ०२० २४३३ ००७५ | ई-मेल-asmashtangayu@gmail.com

2032/B/2, सदाशिव पेठ, कै. वै. ह. बा. परांजपे चौक, विजयनगर कॉलनी, पुणे-४११०३०
( संलग्न : महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक - कॉलेज कोड नं. ३२०१ )

उपस्थित होते. याशिवाय शारदा शक्ती संस्थेच्या पदाधिकारी डॉ. सौ. लीना बावडेकर आणि सौ. कशाळे मॅडम उपस्थित होत्या. बक्षीस वितरण समारंभाचे सूत्रसंचालन उपप्राचार्य डॉ. मनोज चौधरी सरांनी केलेया स्पर्धेच्या आयोजनासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. भीम गायकवाड सरांनी मार्गदर्शन केले.

या स्पर्धेच्या आयोजनामध्ये महाविद्यालय आणि रुग्णालय यांचे अध्यापक आणि शिक्षकेतर कर्मचारी यांनी उत्स्फुर्तपणे सहभाग घेतला होता.

आपले,

डॉ. प्रकाश ठोंबरे
विभाग प्रमुख
स्वस्थवृत्त विभाग

डॉ. भीम गायकवाड
प्राचार्य
अष्टांग आयुर्वेद महाविद्यालय, पुणे

## “आरोग्यवर्धक पाककृती स्पर्धा”


















